नियमित फौजदारी खटला क्र. १९/२०१७
सरकार वि.देवदान
निशाणी क्र.– ५६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०४) यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः–  गणेश भाउसाहेब गाले,
वय सुमारेः–  ३४ वर्षे, व्यवसायः– शेती
निवासस्थानः–  मिरी ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

**सरतपासणी**

**अभियोग पक्षाकरिता श्रीमती ए. बी. कुलकर्णी सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

मी फिर्यादी व आरोपी यांना ओळखत नाही. घटना कधी, कोठे व काय घडली याची मला माहिती नाही. असे काही घडले नाही की, दि. ०३.०३.२०१६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा. चे सुमारास, मी वेल्डींग काम करणेसाठी प्रशांत घायाळ व आदिनाथ गाले यांचेकडे गेलो असता मला समजले की, माझ्या ढाब्याच्या खालील शेतामध्ये फिर्यादी व त्यांचा मित्र सतिष भंडारीयांना आरोपी यांनी सोने देतो असे म्हणून विश्वासात घेवून चार लाख रुपये घेवून आले व त्यांना मारहाण करुन दमदाटी करुन पैसे चोरले म्हणून पोलिसांनी पकडले व परशुराम भोसले याने चोरलेली अंगठी काढुन दिली. पोलिसांनी माझा जबाब व पुरवणी जबाब नोंदविला.

(साक्षीदार पुर्वीच्या जवाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ... सबब ती देण्यात आली.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३.०३.२०१६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा. चे सुमारास, मी वेल्डींग काम करणेसाठी प्रशांत घायाळ व आदिनाथ गाले यांचेकडे गेलो असता मला समजले की, माझ्या ढाब्याच्या खालील शेतामध्ये फिर्यादी व त्यांचा मित्र सतिष भंडारीयांना आरोपी यांनी सोने देतो असे म्हणून विश्वासात घेवून चार लाख रुपये घेवून आले व त्यांना मारहाण करुन दमदाटी करुन पैसे चोरले म्हणून पोलिसांनी पकडले व परशुराम भोसले याने चोरलेली अंगठी काढुन दिली. आता मला माझा जबाब व पुरवणी जबाब दाखविण्यात आला. माझ्या जबाब व पुरवणी जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या जबाबात व पुरवणी जबाबात कसा आला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गावातील व

गावाशेजारी असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपासणी</u>**

**<u>आरोपी क्र. १ व २ करिता श्री. आर एन खेडकर वकील</u>**

**<u>आरोपी क्र.३ करिता श्री. यु. के. खेडकर वकील</u>**

०३. ... नाकारला.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE Date: 2025.11.13 17:12:38 +0530

दिनांकः १३.११.२०२५.

(**रविकिरण सपाटे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), पाथर्डी.